## कोतवाल पद भरती जाहीरात- २०२३ ता. जाफ्राबाद जि. जालना
## जाहीरात क्रमांक/मशाका/आस्थापना/कोतवाल भरती-२०२३/कावी दि ०७/०८/२०२३

महाराष्ट्र शासन,महसूल व वन विभाग शासन निर्णयक्र.के.ओटी - २०१२/प्र.क्र.४३३/ई-१०, दिनांक ०५ सप्टेंबर,२०१३ व शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१७/ई-१०, दिनांक १७ मे,२०२३ अन्वये तहसिल कार्यालय जाफ्राबाद यांचे आस्थापनावरील अवर्गीकृत कोतवाल संवर्गातील रिक्त पदांच्या पदभरतीसाठी खालील प्रमाणे प्रवर्ग निहाय उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

### कोतवाल संवर्गातील रिक्त पदाचे आरक्षण (एकत्रित मानधन मासिक रू. १५,०००/-

| अ.क्र. | जातीचाप्रवर्ग | महिला | समांतरआरक्षणाशिवायभरावयाचीपदे | एकुण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती | ० | ० | ० |
| २ | अनुसुचित जमाती | ० | १ | १ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ० | १ | १ |
| ५ | भटक्या जमाती(क) | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जमाती(ड) | ० | १ | १ |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | १ | १ |
| ९ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | १ | २ | ३ |
| १० | खुला | १ | ३ | ४ |
|  | **एकुण** | **२** | **९** | **११** |

टिपः-

१. प्रस्तुत जाहिरातीमध्ये संक्षीप्त तपशील दिलेला आहे. सदर भरतीच्या अनुषंगाने कोतवाल या पदासाठी सामाजिक व समातंर आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशील, सविस्तर टिपा, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इतर अटी व शर्ती परिक्षेसाठी शुल्क, परिक्षा पध्दती, सर्वसाधारण सुचना, अर्ज करण्यासंबंधीच्या सुचना इ. आवश्यक माहिती, सविस्तर जाहिरात तहसिल कार्यालय, जाफ्राबाद येथील नोटीस बोर्डावर, जालना जिल्हयाच्या http://www.jalna.nic.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. सदरील जाहिराती बाबतचे जाहीर प्रगटन सर्व तलाठी सजे, ग्रामपंचायती अंतर्गत गावे, पंचायत समिती, तहसिल कार्यालय, उप विभागीय कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

३. प्रस्तुत पदभरतीसाठी अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने जाहीरात व जाहिरातीमधील सामाजिक आरक्षण, समातंर आरक्षण व सुचना काळजीपूर्वक वाचून त्यांना लागू होणा-या बाबी विचारात घेवूनच अर्ज करावा.

४. प्रस्तुत प्रक्रियेत अर्ज समक्ष स्विकारले जाणार आहे. अर्ज पोस्टाव्दारे स्वीकारले जाणार नाही.

५. प्रस्तुत प्रक्रियेसाठी महत्वाच्या तारखा / वेळापत्रक खालील प्रमाणे

| बाब | दिनांक | |
|---|---|---|
| | पासून | पर्यंत |
| अर्ज करण्याचा कालावधी | ०८/०८/२०२३ | २२/०८/२०२३ |
| बँकेत डी डी भरण्याचा कालावधी | ०८/०८/२०२३ | २२/०८/२०२३ |
| लेखी परीक्षा | १०/०९/२०२३ (रविवार रोजी- स.११.०० ते १२.३०) | |
| कोतवाल वयोमर्यादा | किमान १८ व कलाम ४० वर्ष | |
| शैक्षणिक पात्रता | उमेदवार किमान चौथी पास असावा | |

दिनांकः- . .०८.२०२३
स्थळ :- जाफ्राबाद

सदस्य सचिव
तालुकानिवड समिती तथा
तहसीलदार जाफ्राबाद

अध्यक्ष
तालुकानिवड समिती तथा
उपविभागीय अधिकारी भोकरदन

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

# तहसील कार्यालय जाफ्राबाद

प्रशासकीय इमारत

दुरध्वनीक्रमांक:- ०२४८२/२२५५०२ E-mail ID :-tahjafrabad@gmail.com

जा.क्र.२०२३/मशाका/आस्था/कोतवाल भ. जाहिरात/कावी -दिनांक:- .०८.२०२३

## *जाहिरात*

### कोतवाल पदभरती परीक्षा- २०२३

महाराष्ट्र शासन,महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.के.ओट -२०१२/प्र.क्र.४३३/ई-१०,दिनांक०५ सप्टेंबर,२०१३ व शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१७/ई-१०,दिनांक १७मे,२०२३ नुसार कोतवाल भरतीसाठी सुधारित नियम मार्गदर्शकतत्वे निर्गमित केली आहेत. तसेच मा. जिल्हाधिकारी जालना यांचेकडील पत्र जा.क्र.२०२३/मशाका-१/आस्था-२/कोतवालभरती/कावी दिनांक.१८.०५.२०२३ मध्ये नमुद नुसार शासन पत्र जा.क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१७/ई-१०दिनांक १७.०७.२०२३अन्वये कोतवाल संवर्गातील रिक्त असलेल्या पदांच्या ८०टक्के मर्यादित पदे भरण्यास एक विशेषबाब म्हणुन शासनाने मान्यता दिलेलीआहे.

त्यानुसार तहसीलदार,जाफ्राबाद यांच्या आस्थापेनवरील अवर्गीकृत कोतवाल संवर्गातील रिक्त पदेभरण्याकरिता खालीलप्रमाणे प्रवर्ग निहाय उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**कोतवाल पदाचे मासिक एकत्रित मानधन:-रुपये१५,०००/-**

**कोतवाल संवर्गातील रिक्त पदांचे आरक्षण**

**एकुण पद संख्या –११**

| अ.क्र. | जातीचाप्रवर्ग | महिला | समांतर आरक्षणाशिवाय भरावयाची पदे | एकुण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचीतजाती | ० | ० | ० |
| २ | अनुचसुचित जमाती | ० | १ | १ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ० | १ | १ |
| ५ | भटक्या जमाती (क) | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जमाती (ड) | ० | १ | १ |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | १ | १ |
| ९ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | १ | २ | ३ |
| १० | खुला | १ | ३ | ४ |
| | **एकुण** | २ | ९ | ११ |

**१. टिप :-**

१. सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत (कमी/जास्त) बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगीत झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.

२. महिलांसाठी आरक्षीत पदावर महिला उमेदवार न मिळाल्यास महिला व बाल विकास विभागाचा शासन निर्णय दिनांक २५.०५.२००१ अन्वये त्या-त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून सदर पदे भरण्यात येतील.

**२. शैक्षणिक पात्रता :-**

१. उमेदवार किमान चौथी उत्तीर्ण (पास) असावा.
२. उमेदवारास मराठी भाषा लिहिता व वाचता येणे आवश्यक आहे.

**३. वयोमर्यादा :-**

१. कोतवाल पदासाठी दिनांक २४.०७.२०२३ रोजी वय किमान १८ व कमाल ४० वर्षपेक्षा जास्त नासावे. वयाचा पुरावा/शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी.) / प्रवेश निर्गम उतरा सांक्षाकीत जोडावा.

**४. इतर अटी / शर्ती व सामाजिक आरक्षण :-**

१. अर्जदार शारिरीकदृष्टया सुदृढ असावा तसेच हा जाफ्राबाद तालुक्यातीलच रहिवासी असावा व तहसीलदार/नायब तहसीलदार यांनी निर्गमित केलेले रहिवासी प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.
२. कोतवाल हे पद वर्ग चार संवर्गात मोडत नाही व सदरील पद हे अवर्गीकृत असल्यामुळे अपंग, प्रकल्प/भुकंपग्रस्त, अंशकालीन, खेळाडू, माजी सैनिक इत्यादीसाठी देण्यात आलेली वयोमर्यादा, शिथीलता व आरक्षण कोतवाल भरतीसाठी असणार नाही.
३. मागसवर्गीय उमेदवारांनी उपजिल्हाधिकारी दर्जाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील व जात वैधता प्रमाणपत्र नियुक्तीनंतर सहा महिन्यात सादर करणे आवश्यक राहील.
४. मागासवर्गीय उमेदवारांनी त्या-त्या प्रवर्गाचे मुळ जात प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे बंधनकारक राहील. तसेच शासन निर्णय शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ब दिनांक १२/१२/२०११ अन्वये संबंधीत उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून, जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहून दिल्यानंतर विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
५. खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, वि.जा. (अ), भ.ज.(ब),भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.
६. मागसवर्ग प्रवर्गातील इतर मागासवर्ग, वि.ज. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या महिला सदस्यांना महिलांच्या ३० टक्के आरक्षणासाठी क्रिमिलेअर मध्ये मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकारी यांचे दिनांक ३१.०३.२०२४ या दिनांकापर्यंत वैध असलेले नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.
७. महिला समांतर अरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांकरीता शासन निर्णय क्र.महिला २०२३/प्र.क्र.१२३ कार्या-२ अन्वयेच्या दि.०४.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्देशानुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षीत असलेल्या पदावरील निवडीकरीता गुणवत्तेच्या अधारावर पात्र ठरणा-या महिला उमेदवारांना नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून सदर शासन निर्देशातील मुद्दा क्र.४ नुसार अनूसुचीत जाती व अनूसुचीत जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षीत असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
८. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील उमेदवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक १२.०२.२०१९ व दिनांक ३१.०५.२०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
९. कोतवाल म्हणून नेमणूक झाली तर त्यांना नेमून दिलेल्या गावांत राहून काम करेल असे रु.१००/- चे बाँड वर हमीपत्र दयावे. तसेच कोतवाल म्हणून नियुक्ती झाल्यापासून परत रु.१००/- चे बंधपत्रावर तारण म्हणून परिच्छेद ४ च्या (फ) नमुन्यात दोन जामीन दयावे लागतील.
१०. निवड झालेल्या उमेदवारांना शारीरिक क्षमतेबाबतचे वैदयकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल.
११. कोतवाल या पदावर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असेल.
१२. कोतवाल हा पुर्णवेळ गावकामगार असले. कोतवाल हे पद गट क व ड संवर्गातील नसून ते अवर्गीकृत पद (Non Classified) आहे. त्यामुळे सदर पदास सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळणार नाही.
१३. महसूल व वन विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१९१/ई-१०, दिनांक ०६ एप्रिल, २०२३ मध्ये नमूद केल्यानुसार कोतवालास प्रतीमाह **रु.१५०००/-** एवढे मानधन राहील.

**५. परीक्षा शुल्क (फी) :-**

१.प्रस्तुत भरती प्रक्रियेसाठी खालील प्रमाणे परीक्षा शुल्क राहील.

| | |
|---|---|
| खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकीरता | रु.५००/- |
| मागासवर्गीय उमेदवारांकरीता | रु.४००/- |

२. वरीलप्रमाणे परीक्षा शुल्क "**तहसीलदार, जाफ्राबाद तथा सदस्य सचिव, कोतवाल निवड समिती**" या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचे डी.डी. (डिमांड ड्राफ्ट) अर्जासोबत सादर करावा. सदर रकमेचा धनादेश (चेक) स्विकारला जाणार नाही. धनादेश जोडलेले अर्ज फेटाळण्यात येईल.
(परीक्षा शुल्क बँक प्रोसेसींग चार्जेस तसेच त्यावरील देय कर वगळून राहील)
३. वरीलप्रमाणे परीक्षा शुल्क हे ना-परतावा (Non-Refundable) राहील.

**६. परीक्षा व निवड पध्दती :-**

१. कोतवाल पदासाठी लेखी परीक्षा रविवार दिनांक १०.०९.२०२३ रोजी जिल्हयातील विविध परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल.
२. लेखी परीक्षा ही ५० प्रश्न असलेली वस्तूनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असले. लेखी परीक्षेत सामान्य ज्ञान, अंकगणित, मराठी भाषा विषय व जिल्हयाची सर्वसाधारण माहिती या विषयावरील प्रश्न असतील.

३. महसूल व वन विभागाचे शासन निर्णय दिनांक १७.०५.२०२३ नुसार ५० प्रश्न व १०० गुणांची लेखी परीक्षा राहील.
४. गुणवत्ता क्रम हा लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या अधारे म्हणजेच एकुण १०० गुणांपैकी मिळालेल्या गुणांच्या अधारावर राहील.
५. लेखी परीक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्ता धारण करणा-या पात्र उमेदवारांची निवड यादी दिनांक १८.०९.२०२३ रोजी तहसील कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेचजालना जिल्हयाच्या अधिकृत संकेतस्थळावर (http://www.jalna.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल.
६. लेखी परीक्षेमधून पात्र उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी दिनांक १९.०९.२०२३ व २०.०९.२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. तहसील कार्यालय,जाफ्राबाद येथे करण्यात येईल.
७. लेखी परीक्षेमधील प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड यादी दिनांक २१.०९.२०२३ पर्यंत तहसील कार्यालयाचे नोटीस बोर्डावर तसेच जालना जिल्हयाच्या अधिकृत संकेतस्थाळावर (http://www.jalna.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल.
८. उमेदवारांससमसमान गुण मिळाल्यास गुणवत्ता क्रम हा दिनांक २७.०६.२००८ चे शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.
९. सत्यता पडताळणीमध्ये अर्जात नमूद केलेल्या बाबींचे प्रमाणपत्र/अभिलेखे/कागदपत्रे सादरकरण्यास उमेदवार असमर्थ ठरल्यास त्यास भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल व पुढील गुणानुक्रम असणा-या उमेदवारांस संधी देण्यात येईल.
१०. निवड करण्यात आलेल्या उमेदवार निवड झाल्यापासून १५ दिवसाच्या आत रुजु न झाल्यास प्रतिक्षाधीन यादी मधील दुसरे उमेदवार यांची नियुक्ती करण्यात येईल.

**७. अ) अर्ज कसा करावा :-**

१. सदर पदासाठी करावायाच्या अर्जाचा नमुना तहसील कार्यालय, जाफ्राबाद येथे **रु.५०/- शुल्क** भरुन उपलब्ध होईल.
२. जाहिराती सोबत प्रसिध्द करण्यात येत असलेल्या विहित नमून्यातील अर्ज त्यामधील माहिती/ तपशील सुस्पष्टपणे नमूद करुन सादर करावा.
३. शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडाव्यात.
४. जातीचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी तसेच उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमी लेअर) चे तत्व अनु.जाती /जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गाला लागू असल्याने उन्नत / प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०२३-२०२४ या वर्षातीलतसेचअर्जाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत निर्गमित झालेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी.
५. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख व कार्यालयाचा पत्ता उमेदवाराने संपुर्ण भरलेला आपला अर्ज, शैक्षणिक पात्रता, जातीचे प्रमाणपत्र, विहित नमून्यात भरुन **तहसीलदार तथा सदस्य सचिव, तालुका निवड समिती, तहसील कार्यालय,जाफ्राबादयासमक्ष** दिनांक २२.०८.२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत) (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) सादर करावेत. टपालाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच यासंबंधाने उमेदवारासमवेत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
६. अर्जाच्या पाकीटावर कोतवाल पदासाठी अर्ज व सामाजिक (मागासवर्ग) आरक्षणानुसार प्रवर्ग नमूद करावा.
७. अर्जदाराने स्वतःचा पत्ता असलेला व त्यावर रु.५/- चे टपालाचे तिकीट असलेला लिफाफा अर्जासोबत देणे बंधनकारक राहील. ज्यामूधन अर्जदार यांना लेखी परीक्षेसाठी प्रवेशपत्र टपालाद्वारे पाठविण्यात येईल. टपालाद्वारे प्रवेशपत्र प्राप्त न झाल्यास संबंधीत तहसील कार्यालयामधून उमेदवारास त्यांचे प्रवेशपत्र दिनांक ०८.०९.२०२३ व दिनांक ०९.०९.२०२३ रोजी पर्यंत स्वतःचे ओळखीचा पुरावा दाखवून हस्तगत करता येईल.
८. सर्व प्राप्त अर्जाची छाननी केल्यानंतर परिक्षेसाठी पात्र / अपात्र उमेदवारांची यादी दिनांक २८.०८.२०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजता तहसील कार्यालयाचे नोटीस बोर्डावर डकविण्यात येईल व जालना जिल्हयाचे संकेत स्थळावर (http://www.jalna.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल.
९. पात्र व अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द केल्यांनतर काही आक्षेप (उदा.नाव, जन्म तारीख, प्रवर्ग इ. मधील दुरुस्ती बाबत) असल्यास दिनांक २९.०८.२०२३ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत तहसीलदार तथा सचिव तालुका निवड समिती यांचे समक्ष सादर करावे. टपालाद्वारे किंवा अन्य मार्गाने प्राप्त आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.
१०. सदर लेखी परिक्षेची उत्तर तालिका तहसिल कार्यालय जाफ्राबाद व उपविभागीय अधिकारी कार्यालय भोकरदन येथेआणि जालना जिल्हयाचे अधिकृत संकेत स्थळावर (http://www.jalna.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल.

**७. ब) उमेदवाराने अर्ज सादर करतांना अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर कराव्यात. तसेच गुणानुक्रमे लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणी वेळी खालीलप्रमाणे दस्तऐवजाच्या मुळ प्रती सादर करावे लागतील.**

१. शैक्षणिक अर्हतेचे मुळ प्रमाणपत्र
२. वयासंबंधी दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (टि.सी.) / शाळेचा प्रवेश निर्गम उतारा)
३. जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र
४. तहसीलदार / नायब तहसीलदार यांनी निर्गमित केलेले रहिवासी प्रमाणपत्र
५. नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (अर्जाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत निर्गमित झालेले)

८. कोतवाल भरतीचा कालबध्द :-

| अ.क्र. | बाब | कालावधी | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | अर्ज दाखल करणे | दि.०८.०८.२०२३ ते २२.०८.२०२३ (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) | कार्यालयीन वेळ | तहसील कार्यालय, जाफ्राबाद |
| २. | लेखी परीक्षेसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि.२४.०८.२०२३ | कार्यालयीन वेळ | १. उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन<br>२. तहसील कार्यालय, जाफ्राबाद<br>३. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर http://www.jalna.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ३. | ज्यांना प्रवेशपत्र पोष्टाने प्राप्त झाले नाहीत अशा उमेदवारांना तहसील कार्यालयातून प्रवेशपत्र देणे | दि.०८.०९.२०२३ ते दि. ०९.०९.२०२३ (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) | कार्यालयीन वेळेत | |
| ४. | लेखी परीक्षा | दि.१०.०९.२०२३ | सकाळी ११ ते १२.३० | परीक्षेचे ठिकाण प्रवेश पत्राद्वारे पोष्टाने कळविण्यात येईल. |
| ५. | प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द करणे | दि.१२.०९.२०२३ | सायंकाळी ५.०० वाजता | १. उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन<br>२. तहसील कार्यालय, जाफ्राबाद<br>३. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर http://www.jalna.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ६. | प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द झाल्यानंतर त्यावर काही आक्षेप/हरकती असल्यास त्या सादर करणे | दि. १३.०९.२०२३ ते दि.१४.०९.२०२३ | कार्यालयीन वेळेत | तहसील कार्यालय, जाफ्राबाद |
| ७. | अंतिम उत्तरतालिका प्रसिध्द करणे | दि.१५.०९.२०२३ | कार्यालयीन वेळेत | १. उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन<br>२. तहसील कार्यालय, जाफ्राबाद<br>३. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर http://www.jalna.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ८. | लेखी परीक्षेतील गुणवत्ता क्रमानुसार पात्र उमेदवारांची अटी व शर्तीच्या अधीन राहून तात्पुरती यदी प्रसिध्द करणे | दि.१८.०९.२०२३ | कार्यालयीन वेळेत | १. उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन<br>२. तहसील कार्यालय, जाफ्राबाद<br>३. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर http://www.jalna.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | मुळ कागदपत्रांची पडताळणी | दि.१९.०९.२०२३ व दि. २०.०९.२०२३ | कार्यालयीन वेळेत | उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन |
| १०. | अंतीम निवड यादी प्रसिध्द करणे | दि.२१.०९.२०२३ | कार्यालयीन वेळेत | १. उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन<br>२. तहसील कार्यालय, जाफ्राबाद<br>३. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर http://www.jalna.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. |

**९. सर्वसाधारण सुचना:-**

१. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हाक्क प्राप्त झाला आहे असे समजता येणार नाही.

२. उमेदवारांस लेखी परिक्षेसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

३. एखादया उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

४. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, विहित ठिकाणी स्वाक्षरी नसलेले अर्ज, जाफ्राबाद तालुक्यातील रहिवासी नसलेल्या उमेदवारांचे अर्ज, विहित शुल्काचे चलन न जोडलेले अर्ज, चुकीच्या बॅकेत भरणा केलेले चलन आणि मुळ चलनाची प्रत न जोडलेले अर्ज विहित पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, अपुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, फोटो नसलेले व फोटो स्वसाक्षांकीत न केलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत न जोडलेले अर्ज, विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज, विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

५. या जाहीरातीला अनुसरून ज्या उमेदवाराचे अर्ज विहित कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. ज्या उमेदवारांनी या जाहिरातीपूर्वी तहसील कार्यालय, जाफ्राबाद किंवा उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन किंवा जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे कोतवाल पदासाठीच्या नोकरीसाठी अर्ज सादर केलेले आहेत त्या अर्जदाराचे अर्जाचा विचार केला जाणार नाही. त्यांनी नव्याने विहित नमुन्यात विहित मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

६. अर्ज करणा-या उमेदवाराने अर्जावर विहित ठिकाणी नजीकच्या काळातील पासपोर्ट साईज फोटो लावावा व फोटोवर स्वतःची स्वाक्षरीकरावी. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, जातीचा दाखला व इतर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. कोणतेही मूळ कागदपत्रअर्जासोबत दाखल करु नयेत. उमेदवाराने त्याची आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी सादर करणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

७. कोतवाल भरतीचा अर्ज तहसील कार्यालय, जाफ्राबाद येथे उपलब्ध आहे व तेथेच अर्ज स्वीकृत केले जातील याची नोंद घ्यावी.

८. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, सामाजिक आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, सेवा प्रक्रियेत बदल करणे, भरती प्रक्रियेसंदर्भात उद्भवणारे वाद, अन्य कोणतीही तांत्रिक /प्रशासकीय अडचण / तक्रारीयाबाबतचे **सर्व अधिकारतालुका निवड समिती, जाफ्राबाद** स्वतःकडे राखून ठेवीत आहे. उक्त कोणत्याही बाबींवर सदर समितीचा निर्णय अंतिम राहील.

९. सदरील जाहिराती बाबतचे जाहीर प्रगटन सर्व तलाठी सज्जे, ग्रामपंचायती, ग्रामपंचायत अंतर्गत गावे, मंडळ कार्यालये, पंचायत समिती, तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आली आहे.तसेच जालना जिल्हयाच्या (http://www.jalna.nic.in) या अधिकृत संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

दिनांक:- .०८.२०२३
स्थळ :- जाफ्राबाद

**सदस्य सचिव**
**तालुकानिवड समिती तथा**
**तहसीलदार जाफ्राबाद**

**अध्यक्ष**
**तालुकानिवड समिती तथा**
**उपविभागीय अधिकारी भोकरदन**